MAHBIL03429/13/1/2000-TC    खाजगी वितरणासाठी    वर्ष: नववे । अंक: पहिला । मे, २००९

# CIDCO Nirmiti
A NEWSLETTER



01 अचुक नियोजन आणि विकासाच्या यशस्वीतेचे निष्कर्ष नोंदविणारा नवी मुंबईतील सर्व्हेक्षण अहवाल


06 सिडको कार्यालय नवीन औरंगाबाद येथे बाबासाहेब आंबेडकर यांची ११८ वी जयंती उत्साहात साजरी


07 नितळ भावविश्वाचे बिंब-प्रतिबिंब श्री. माणिक मुंडे यांचा 'आइना-मुआईना'


08 सिडकोचे अधिकारी, कर्मचारी अभिनंदनास पात्र


## अचुक नियोजन आणि विकासाच्या यशस्वीतेचे निष्कर्ष नोंदविणारा नवी मुंबईतील घाऊक, किरकोळ, सेवा उद्योग आणि खुले बाजार-रोजगार, गुंतवणूक आणि वार्षिक उत्पन्न सर्व्हेक्षण अहवाल

नवी मुंबईतील घाऊक-किरकोळ, सेवा उद्योग तसेच खुले बाजार यांचा विकास होण्यासाठी सिडकोने पूर्वीपासूनच उद्योजक-व्यापाऱ्यांना व व्यवसायिकांना सर्व सेवासुविधांयुक्त असे मुक्त अवकाश उपलब्ध करून दिले. ३९ वर्षांत इथल्या या व्यवसाय क्षेत्राचा विस्तार अफाट वेगाने झाला. हा झालेला विकास रोजगार, गुंतवणूक आणि वार्षिक उत्पन्न या निकषांवर कसा प्रभाव करता झाला याच्या अद्ययावत माहितीकरिता सिडकोने वरिष्ठ सांख्यिकी **श्रीमती रीता अब्बी** व सल्लागार **प्रा. पी. सी. सक्सेना** यांच्या नेतृत्त्वाखाली **'Wholesale, Retail, Service Industry & Open markets in Navi Mumbai, Employment, Investment, Turnover'** अर्थात ''नवी मुंबईतील घाऊक, किरकोळ, सेवा उद्योग आणि खुले बाजार रोजगार, गुंतवणूक आणि वार्षिक उत्पन्न'' हे सर्व्हेक्षण नुकतेच पार पाडले. नवी मुंबईतील घाऊक, किरकोळ, सेवा उद्योग आणि खुले बाजार या क्षेत्रांमुळे नवी मुंबईतील रोजगार निर्मिती, गुंतवणूक आणि आर्थिक उलाढालीतील परिवर्तनांच्या संदर्भात या सर्व्हेक्षणात प्राप्त झालेली माहिती अतिशय उत्साहवर्धक अशी आहे. त्यातून प्राप्त निष्कर्षांवर दृष्टिक्षेप टाकल्यास सिडकोने नवी मुंबईत कटाक्षाने रुजविलेले व्यवसायिक वातावरण आजच्या बदलांच्या प्रवाहाला आपल्यात मोठ्या सामर्थ्यानिशी सामावून घेत आहे आहे असे निदर्शनास येते.


*Fig. 4.5 Percentage distribution of annual turnover by type of industry*

या सर्व्हेक्षणामागील सिडकोची भूमिका स्पष्ट करताना उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक **श्री.जी.एस. गिल्ल** म्हणतात, 'सुनियोजन आणि विकासाच्या तीन दशकांनंतर, सिडको महामंडळाने साधलेल्या महत्त्वपूर्ण बदलांचे सिंहावलोकन करणे गरजेचे आहे. त्या आवश्यकतेनुसार सिडकोच्या सांख्यिकी विभागाने आजवर गृहनिर्माण, वाणिज्यिक, औद्योगिक, शैक्षणिक, आरोग्य सेवा क्षेत्रांचे संशोधनात्मक अध्ययन पूर्ण केले आहे. हे अहवाल नियोजनकार आणि धोरण निर्मात्यांना आर्थिक विकासांतील तृटी दूर करण्यासाठी विकासाची व्यूहरचना आखण्यास अतिशय उपयुक्त ठरतील.' २००७ मध्ये नवी मुंबईतील आरोग्यसेवांचे जाळे, सुविधा, कार्मिक आणि सेवा यांचे जे सर्व्हेक्षण करण्यात आले होते, त्या सर्व्हेक्षणाचाच पुढील भाग म्हणून या सर्व्हेक्षणाकडे पहाता येईल. या सर्व्हेक्षणात कर्मचाऱ्यांची संख्या, व्यवसाय वास्तूंच्या मालकीचे स्वरूप, स्थापनेचे वर्ष, कमाल/किमान बांधकाम खर्च व भाडे, एकूण गुंतवणूक आणि उलाढाल, कर्मचाऱ्यांचे सामाजिक अस्तित्व-आर्थिक समर्थता आणि





पर्यावरण व व्यवसायाशी संबंधित सुविधा यांचे अद्ययावत तपशील मिळविणे हे उद्देश बाळगण्यात आले.

नवी मुंबईतील या व्यवसाय क्षेत्राने रोजगारांच्या बाबतीत दिलेली स्वयंपूर्णता अतिशय सुखावह अशीच आहे. सुमारे १९ लक्ष लोकसंख्येचा आत बाहेरचा आकडा ओलांडणाऱ्या नवी मुंबईने सुमारे २ लक्ष ३३ हजार ५९३ जणांना या व्यवसाय क्षेत्रात सामावून घेतले आहे. क्षेत्रानुसार कर्मचाऱ्यांची संख्या पहायची झाल्यास वाशीच्या घाऊक बाजाराच्या ५,६७९ युनिट्स मध्ये ६७,८८४ पनवेल येथील १७५ युनिटमध्ये १,५०४ कर्मचारी आहेत, कळंबोलीच्या लोहपोलादाच्या बाजारातील २,०७७ युनिटमध्ये १८,४१४ कर्मचारी कार्यरत आहेत. किरकोळ उद्योगातील २८,०३१ युनिट्समध्ये ८६,८९६, सेवा उद्योगांच्या ११,१८७ युनिट्समध्ये ३९,२६६ तर खुल्या बाजाराच्या १३,०८६ युनिट्समध्ये १९६२९ कर्मचारी सेवा देत आहेत. नवी मुंबईतील विविध औद्योगिक घटकांतील फक्त या एकातच जर इतके रोजगार उपलब्ध असतील तर ती बाब सिडकोच्या रोजगार निर्मितीसाठी आजवर घेतलेल्या परिश्रमांचे सार्थक होत असल्याचा निर्वाळा असेल. या कर्मचाऱ्यांना मिळणारे सरासरी मासिक वेतन हे वेतनाच्या आदर्श पातळीवरही आहे. किरकोळ बाजारातील कर्मचाऱ्यांना सरासरी रु. १५,१३०/- सेवा उद्योगातील कर्मचाऱ्यांना सरासरी रु.१५,८२१/- तर खुल्या बाजारातील कर्मचाऱ्यांना रु. ८,५३८/- इतक्या मासिक उत्पन्नाची प्राप्ती होत असल्याचे आढळले. नवी मुंबईतील वाशी, पनवेल आणि कळंबोली येथिल किरकोळ, सेवा उद्योग क्षेत्र आणि खुल्या बाजाराच्या केलेल्या सर्व्हेक्षणानुसार आढळलेल्या ६०,२३५ विक्रेय वस्तूंची दुकाने, ७,९३१ घाऊक बाजार, २८,०३१ किरकोळ, ११,१८७ सेवा उद्योग आणि १३,०८६ दुकानांच्या निरीक्षणातून आलेले हे निष्कर्ष आहे.

उल्लेखलेल्या सर्वप्रकारचा बाजाराची सर्वाधिक संख्या वाशी या उद्योग उपनगरीत आढळली तर दुकाने/स्टॉल्स यांचे सर्वाधिक प्रमाण ग्रामीण क्षेत्रात आहे. यांद्वारे होणाऱ्या आर्थिक अभिसरणावर झोत टाकायचा तर सुमारे १४०.३१











दशकोटी रूपयांचे वार्षिक चलनावलन हे उद्योग क्षेत्र करीत आहेत. यात ५०.४२ कोटी रुपयांची उलाढाल वाशी कृषिउत्पन्न बाजार, १.१५ कोटी रुपयांची उलाढाल पनवेल येथील कृषी उत्पन्न बाजारात, किरकोळ बाजारात १७.०२ कोटी, सेवा उद्योगात ३०.०२ कोटी तर खुल्या बाजारात २.७८ कोटी रुपयांची आर्थिक उलाढाल होत आहे. लिंग व वयोगटानुसार केलेल्या कर्मचाऱ्यांच्या वर्गिकरणातून नवी मुंबईतील लिंगभेदातीत अशा प्रगल्भ कार्यसंस्कृतीची ठळक ओळख मिळते. किरकोळ बाजारातील एकूण कर्मचाऱ्यांत ५१.०२ टक्के पुरुष तर ४९.०८ टक्के स्त्री कर्मचारी आहेत. इतर क्षेत्रात हे प्रमाण पुरूषप्रधानतेकडे झुकणारे असले तरी त्यातील परिवर्तनांची शक्यता अधिक असल्याचे ठायीठायी जाणवते. तसेच नवी मुंबई हे तरुणांचं महानगर व तरूण कर्मचाऱ्यांचे महानगर हे वास्तव देखील सुखावते. २० ते ३० वयोगटातील कर्मचारी ४० टक्के तर ३० ते ४० वयोगटातील कर्मचारी ३० टक्के ही आकडेवारी बोलकी आहे.

ही आकडेवारी नवी मुंबईत असलेली प्रचंड व्यवसायाची उर्जा सिध्द करते, यांत दुमत नाही. या व्यवसायात रूजण्याकरिता दळणवळणाच्या साधनांचे त्यात मार्ग, महामार्ग, पादचारी पूल, उड्डाणपूल आणि लोहमार्गाचे इतके अद्यावत जाळे सिडकोने नवी मुंबईत वसवले आहे की नवी मुंबईच्या एका टोकाहून दुसऱ्या टोकापर्यंत इच्छित स्थळी जाण्यासाठी कमाल अर्धातास पुरा होऊ शकतो. याची परिणती म्हणून या सर्व्हेक्षणात आढळून आलेली तत्थेही अतिशय बोलकी आहे. सिडकोने निर्मिलेल्या भौतिक सेवा-सुविधांच्या जाळ्यांनी या क्षेत्रातील व्यापारी व कर्मचारी वर्गाला व्यवसायाची उद्योग व नोकरीधंद्याकरिता नवी मुंबईच आदर्श व्यवसायाचं स्थळ का वाटलं आणि भविष्यातही वाटेल हे सिध्द झालं. सेवा-सुविधांच्या बाबतीत या वर्गाला समाधानी ठरविणारी जी वैशिष्ट्ये आढळली त्यांचा तपशील पुढीलप्रमाणे,

रस्त्यांच्या सोयिस्करपणाची परीक्षा सिडको १०० पैकी १०० गुण मिळवून पास झाली. रस्त्यांविषयी १००% समाधान संबंधितांनी व्यक्त केले. ७५%पाण्याविषयी, ७१% विजेविषयी, ७४%सुरक्षेविषयी, ७४% स्वच्छतेविषयी, ७६% आरोग्यविषयी समाधानी आहेत, म्हणजे सिडको









व अर्थातच नवी मुंबई हे या भौतिक सोयी-सुविधांबाबत प्रथम श्रेणीतील गुणवत्ताधारक आहेत. याला हलकासा धक्का बसतो, तो प्रदुषणासंदर्भात व्यक्त केलेल्या समाधानाच्या टक्केवारीत; ती ६७% इतकी आढळते.

नवी मुंबईतील घाऊक व किरकोळ बाजार उपलब्ध क्षेत्र, सोयी-सुविधा, मालाची-विक्रेय वस्तूंची आवक जावक, आर्थिक उलाढाल आणि कर्मचाऱ्यांची संख्या यां बारकाव्यांवर प्रकाश टाकतांना घाऊक बाजारात आशिया खंडातील सर्वात मोठा आणि पंतप्रधान पुरस्कार विजेता घाऊक बाजार (कृषी उत्पन्न बाजार समिती संकुल, वाशी) आणि पनवेल येथील कृषीउत्पन्न बाजार आणि कळंबोलीतील लोह-पोलाद (Iron & Still Market) बाजार यांचा समावेश करण्यात आला. किरकोळ बाजारांकरिता नवी मुंबईतील सर्वच १४ नोडस्, १५ ग्रामीण क्षेत्र तसेच पनवेल आणि उरण नगर पालिका व औद्योगिक विकास महामंडळाचे क्षेत्र एवढा विस्तृत प्रदेश निवडण्यात आला.

सेवा उद्योगांच्या बाबतीत प्राप्त झालेली माहिती जाणून घेण्यापूर्वी या सामाजिक आणि आर्थिक विकासाचा कणा असणाऱ्या या क्षेत्रात ट्रेडिंग, वाहतूक, संवाद, आर्थिक, रिअल इस्टेट आणि स्वच्छता, वेअर हाऊसिंग, फॅशन डिझायनिंग, ब्यूटीपार्लर्स सारख्या अनेक सेवा व्यवसायांचा समावेश होतो. अगदी ज्वेलरी पासून ज्यूस सेंटर्स, डेअरी, लॉन्ड्री, वर्तमानपत्रे, झेरॉक्स इत्यादीं क्षेत्राचा आढावा घेण्यासाठी त्यांची चार वर्गांत वर्गवारी करण्यात आली. खाद्यपदार्थ, व्यवसाय, सेवा आणि देखभाल व अन्य (Food, business, service & maintainance and other) यात सेवा आणि देखभाल वर्गात सुमारे ५४.७ इतकी सर्वाधिक टक्केवारी आढळली. त्या खालोखाल व्यवसाय २१% खाद्यपदार्थ, १३% आणि ९.५ अन्य या प्रकारांत सेवा देत आहेत. या क्षेत्रात महिला कर्मचाऱ्यांची संख्या मात्र कमी आहे. या क्षेत्राची वार्षिक उलाढाल ३०.२ कोटींची आहे. तर सरासरी १५.८२१ रुपये मासिक उत्पन्न घेणाऱ्या या कर्मचाऱ्यांची साक्षरता पातळीही उत्तम आहे. अगदी पदव्यूत्तर शिक्षण घेतलेले कर्मचारीही यात आहेत. कुठलेही निर्बंध नसणारं सर्वात स्पर्धात्मक बाजार म्हणजे खुला बाजार. त्यात फुले, मासळी, मांस, अंडी, फळे आणि भाजीपाला अशा प्रकारच्या व्यवसायांचा समावेश होतो. नवी मुंबईतील अशा बाजारांतील विक्रेय वस्तुची टक्केवारी सर्वसाधारण

*Fig. 4.4 Percentage distribution of monthly rent paid (in Rs.) by type of service industry.*









पुढीलप्रमाणे, भाजीबाजार ३२.३%, फ्लोरिस्ट १.३% मासे, मांस, अंडी बाजार १०.०%, खाद्यपदार्थ १५.६%, फळ बाजार १६.१% आणि मिश्रबाजार २४.७% यांची मालकी व भाडेतत्वाच्या निकषांवर केलेल्या संशोधनात आढळून आले की सर्वाधिक मालकी हक्काची टक्केवारी या व्यवसाय क्षेत्रात आहे. सुमारे ७३.७% मालकीची दुकाने व २६.३% भाडेतत्त्वावरील दुकाने आहेत. यात २.७८ कोटींची आर्थिक उलाढाल होते.

सिडकोच्या वरिष्ठ सांख्यिकी **श्रीमती रिता अब्बी** यांनी या सर्व्हेक्षण मोहिमेचे नेतृत्व केले. त्यांनी या सर्व्हेक्षणाचे मूल्ये स्पष्ट करताना सांगितले की, ‘नगर नियोजनातील तथ्य नेमकेपणाने जाणून घेणं हे भारतासारख्या वेगाने शहरीकरणाकडे झेपावणाऱ्या देशासाठी आवश्यक ठरते आणि हीच दृष्टी सिडकोच्या यशाचं गमक आहे. प्रस्तुत अहवाल या प्रदीर्घ दृष्टिकोनावर भर टाकण्याचा एक प्रयत्न आहे. आशा आहे की, हा अहवाल नगरनियोजनकार आणि धोरण निर्मात्यांना (Policy Makers) या २१ व्या शतकाच्या महानगराच्या आर्थिक विकासात आढळणाऱ्या तृटी दूर करण्याकरिता व विकसित कराव्या लागणाऱ्या व्यूहरचनांच्या योजना आखण्याकामी मार्गदर्शक ठरेल. शिवाय संशोधक, अर्थतज्ज्ञ आणि बाजाराच्या अर्थकारणावर आणि रोजगाराविषयी रस घेणाऱ्यांनाही हा अहवाल अतिशय उपयुक्त ठरेल’.

हे गुंतागुंतीचे सर्व्हेक्षण पूर्ण करण्यासाठी सिडकोचे उपाध्यक्ष व सहव्यवस्थापकीय संचालक **श्री. जी. एस. गिल्ल** व व्यवस्थापकीय संचालक **श्री. डी. जी. जाधव** यांचेही महत्वपूर्ण मार्गदर्शन लाभले.

या क्षेत्राने नवी मुंबई, मुंबई व उपनगरांना दिलेली रोजगाराची संधी व उज्ज्वल भवितव्याची शाश्वती ही सिडकोच्या निरातिशय समाधानाची बाब आहे. सिडकोने नुसतं अत्याधुनिक महानगर निर्मिलं नाही तर सर्व समावेशक जीवनदृष्टीने स्वयंपूर्ण-परिपूर्ण जीवननगरी वसवीली हे सिद्ध होते. ५१ टक्के मराठी कर्मचाऱ्यांचे संख्याबाहुल्य असणाऱ्या एकूण कर्मचाऱ्यांपैकी ६१ टक्के कर्मचारी नवी मुंबईकर आहेत, ११ टक्के मुंबईहून येतात उपनगरातून (ठाणे, कल्याण, डोंबिवली...), १५ टक्के ग्रामिण भागातून १२ टक्के तर एमआयडीसी क्षेत्रातून ०.४ टक्के कर्मचारी आज नवी मुंबईच्या छायेत रोजगारासाठी सामवले आहेत.





# श्री. मोहन निनावे यांना उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाची जनसंवाद विद्या शाखेतील पीएच.डी पदवी प्रदान



सिडकोचे जनसंपर्क अधिकारी **श्री. मोहन निनावे** यांना उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगावने त्यांनी 'सायबर युगातील जनसंपर्क: महाराष्ट्राच्या संदर्भात चिकित्सक अभ्यास' या विषयाअंतर्गत सादर केलेल्या शोध प्रबंधाकरिता जनसंवाद विद्याशाखेतील पीएच.डी. पदवी प्रदान केली आहे.

डॉ. मोहन निनावे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबादच्या जनसंवाद व वृत्तपत्र विद्या विभागातील प्राध्यापक डॉ. वि.ल.धारुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली केलेले सदर संशोधन जनसंपर्क या विषयातील आजवरचे सर्वात मौलिक संशोधन असून, जनसंपर्क क्षेत्राचा प्रदीर्घ इतिहासपट, वर्तमान परिवर्तने आणि भविष्याच्या उदरात असलेली या क्षेत्रातील सूत्रउर्जा यांना सुसूत्रपणे विषद केले आहे. सात प्रकरणांत विभागलेल्या सदर संशोधनपटात त्यांनी जागतिक व्यवसायपटावर जनसंपर्क माध्यमाचा झालेला उदय, त्या उदयास कारणीभूत ठरलेल्या ऐतिहासिक परिस्थितीचा विश्लेषणात्मक आढावा घेतला आहे, त्यात ते संक्षिप्तपणे नोंदवितात की, 'युरोपातील औद्योगिक क्रांती ही ढोबळमानाने जनसंपर्क माध्यमाचा जननकाळ ठरली. कारण औद्योगिक क्रांतीने साधलेल्या आणि लक्षावधी पटींनी वाढलेल्या उत्पादनांच्या वितरणासाठी नवनवीन संकल्पना अंग धरू लागल्या. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात स्पर्धेच्या युगाला सुरुवात झाली व दुसऱ्या महायुद्धाच्या काळात जनसंपर्क क्षेत्राला 'शास्त्रा'चा दर्जा मिळाला. या कालखंडात कार्यसमूह, औद्योगिक संस्था यांच्या भल्यासाठी जेव्हा अनुकूल लोकमत निर्माण करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न होऊ लागला तेव्हाच व्यवसायिक जनसंपर्काची निर्मिती झाली.' आजवर वापरल्या जाणाऱ्या पारंपरिक जनसंपर्क माध्यमांच्या माहिती वितरण तंत्राचा ऊहापोह करताना पोस्ट-दूरध्वनी ते फॅक्स व्हाया भ्रमणध्वनी या पारंपरिक माध्यमांच्या उपयोजनांचे बारकाईने विश्लेषण केले आहे. त्यानंतर १९८०नंतर भारतात संगणकाचे सार्वत्रीकरण झाल्यानंतर व मागील काही वर्षांच्या काळात माहिती महाजाल व्यवसायाने प्रत्येक क्षेत्र व्यापून दशांगुळे उरल्यावर उपलब्ध झालेल्या प्रगत ई-सुविधांद्वारे जनसंपर्क क्षेत्रात आलेली आमूलाग्र परिवर्तने, त्यामुळे आधुनिक जनसंपर्क क्षेत्राला लाभलेली बलस्थाने, त्यापुढील आव्हाने व भविष्यातील संभाव्यता यांचा सखोल परामर्ष त्यांनी घेतला आहे. ते या संदर्भात नोंदवितात की, '९०च्या दशकात माहिती महाजालाचा भारतीय व्यवसायपटावर झालेल्या उदयामुळे सर्व वाणिज्यिक, सामाजिक, प्रशासकीय व शासकीय स्तरावरील माहिती प्रसारणा संदर्भात जनसमतोल राखणाऱ्या जनसंपर्क क्षेत्राला प्राधान्यक्रमाच्या अग्रभागी स्थान प्राप्त झाले. माहिती क्रांतीने समग्र जनसंपर्क विश्वातही क्रांतीचे वारे खेळवले.'

'नवे सहस्त्रक हे गुणवत्तेचे आहे. जनसंपर्क अधिकारी हा या परिवर्तनाचा अग्रदूत आहे. हे लक्षात घेऊन त्याला नव्या युगाचे प्रगत प्रशिक्षण देण्याची गरज आहे. नजिकच्या काळामध्ये आता जनसंपर्क अधिकाऱ्यास अधिक सम्यक आणि संतुलित स्वरूपाचे कार्य करावे लागणार आहे. प्रगत तत्वज्ञान आणि तंत्रज्ञान यामध्ये सुवर्णमध्य साधून भावी काळात जनसंपर्क अधिकारी हा समर्थपणे वाटचाल करू शकतो, हे लक्षात घेऊन जनसंपर्क विषयक प्रशिक्षण आणि प्रबोधनासाठी रचनात्मक प्रयत्न करावे लागणार आहेत. जनसंपर्काचा भारतीय दृष्टिकोन विकसित करणे आणि तो प्रगल्भ दृष्टीने अधिक गतिमान करणे हे काळाचे आव्हान आहे. असे असले तरी नवीन माहिती तंत्रज्ञानाची वेगाने पुढे येत असलेली लाट जनसंपर्काची व्यूहरचना बदलून टाकत आहे. प्रतिमांची निर्मिती आता केवळ मुद्रित किंवा द्रुकश्राव्य माध्यमांवर अवलंबून नसून, नवीन इंटरनेट वेबसाइट्सचाही प्रतिमानिर्मितीसाठी उपयोग होत आहे. माध्यमांच्या साधनातील मध्यस्थाची भूमिका हळूहळू कमी होत आहे. त्यामुळे प्रत्यक्ष व थेट जनसंपर्क हे आता नव्या सहस्त्रकाचे आव्हान आहे. तथापि प्रगत तंत्रज्ञानाबरोबर विश्वासार्हता किती जोपासली जाईल यावरच प्रतिमा सत्य की भ्रामक हे ठरविता येऊ शकेल.'

जनसंपर्क व्यवसायिक व जनसंपर्क अधिकाऱ्यांच्या दीर्घ मुलाखती घेऊन त्यांचे संख्यात्मक व गुणात्मक विश्लेषण या संशोधनाकरिता त्यांनी केले आहे. त्यायोगे प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे डॉ. मोहन निनावे यांनी मांडलेले निष्कर्ष अत्यंत मौलिक असून या क्षेत्राला नवी दिशा दाखवण्याचे सामर्थ्य आहे, शिवाय हा विषय प्रथमच मांडण्यात आल्यामुळे या क्षेत्रात येऊ पाहणाऱ्या नवोदितांकरिता हे संशोधन अत्यंत उपयुक्त संदर्भ दस्तऐवज ठरणार असल्याचा निर्वाळा त्यांना तज्ज्ञ परिक्षकांच्या समितीने दिला आहे.

या संशोधनाकरिता त्यांना सिडकोचे माजी मुख्य जनसंपर्क अधिकारी श्री. बुद्धभूषण गायकवाड व सिडकोच्या नवीन शहरे विभागाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. दिलीप वाटाणे या अनुभवी जनसंपर्क अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन लाभले.

सिडको परिवारातर्फे डॉ. मोहन निनावे यांच्या यशाबद्दल हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचालीकरीता शुभेच्छा.

## नवीन औरंगाबाद येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर** यांची ११८ वी जयंती डॉ. आंबेडकर जयंती उत्सव समिती, सिडको औरंगाबाद यांच्यातर्फे सिडको नाट्यगृह, नवीन औरंगाबाद येथे साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख पाहुणे म्हणून मुख्य प्रशासक (न.श.) **श्री. मनोहर भगत** तर कार्याध्यक्ष म्हणून प्रशासक **श्रीमती मनीषा जायभाये** तर विशेष अतिथी म्हणून सहा.कार्यकारी अभियंता **श्री. अनिल मोहिले** उपस्थित होते.

प्रारंभी मुख्य प्रशासक श्री. मनोहर भगत यांनी दिप प्रज्वलन करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी **भंतेजी भदन्त महेंद्रबोधी थेरो** यांनी बुध्दवंदना घेतली.

श्री. मनोहर भगत यांनी याप्रसंगी नागरीकांनी बाबासाहेबांनी सांगितलेली पंचशील तत्वे आचरणात आणावीत ही काळाची गरज आहे असे प्रतिपादन केले.

यानंतर **श्री. राजाभाऊ शिरसाठ** यांचा 'भिमवंदना' हा सदाबहार भीमगीतांचा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमास सिडकोचे अधिकारी व कर्मचारी मोठया प्रमाणात उपस्थित होते.



कार्यक्रमाचे प्रास्तविक **श्री.दादाराव दांडगे** यांनी तर सुत्रसंचालन **श्री.जे.एन.पाटील** यांनी केले.

## नितळ भावविश्वाचे बिंब-प्रतिबिंब श्री. माणिक मुंडे यांचा 'आइना-मुआईना'

सिडकोचे मुख्य प्रशासकीय अधिकारी **श्री. माणिक मुंडे** यांच्या **'आइना-मुआइना'** या हिंदी काव्यसंग्रह रसिक भेटीस सादर झाला.




हिंदी वाङ्मयात आदराचे स्थान असणाऱ्या दिल्ली येथील वाणी प्रकाशनाने हा अत्यंत सुबक बांधणीचा व उच्च निर्मितीमूल्य असणारा काव्यसंग्रह रसिकभेटीस सादर केला आहे. संवेदनशील माणसाची घालमेल-घुसमट, त्याची द्विधा परंतु मंगलपथाचीच आस हा काव्यसंग्रह तितक्याच ताकदीने मात्र सुबोध शैलीत व्यक्त करतो. या काव्यसंग्रहाला हिंदी-उर्दू वाङ्मयातील धुरीणांची प्रस्तावना लाभली आहे. ख्यातनाम लेखक गीतकार जावेद अख्तर यांनी ज्येष्ठ शायर फिराक यांचा एक किस्सा सांगून त्यांच्या काव्यशैलीवर केलेले, "जिन्दगी ताण्डव कर रही है मगर उसके होटों पर जो हल्की सी मुस्कान है वही शायरी है। मैं माणिक मुंडे साहब को मुबारक बात देता हूँ की उन्होने आज की तांडव करती जिन्दगीके हॉटोंपर एक और मुस्कान सजा दी हैं।" हे भाष्य त्यांच्यातील निरंतर आशावादी मनोभूमीवर ठळक झोत टाकते. तर त्यांच्या काव्याच्या खोलीचा थांग घेताना शायर उबैद आजम आजमी लिहितात, "यह कविता संग्रह मिट्टीसे जुडी भावनाओं को सही मायने में बयान करता है।...एरिस्टोटल ने कहा है कि हर कवि जिन्दगी भर अपनी रचनाओं द्वारा एक ही प्रश्न का उत्तर खोजता है और वह अहम प्रश्न है कि इन्सान के हिस्से में इतना दु:ख क्यो आता है? यह तलाश ही (इस) कविताका बुनियादी अनुष्ठान हैं।" तर मुंबई उच्च न्यायालयाने माजी न्यायमूर्ती पद्मभूषण न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी यांनी त्यांच्या वास्तविकतेला आकृतीबंध देणाऱ्या भावनेची मीमांसा करताना लिहिले आहे की, "शब्द के पीछे की भावुक बुध्दी, अदम्य मानव निष्ठा, शुध्द प्रत्यय और शुभ दर्शनातुर आँखे इन कविताओंका महत्त्वपूर्ण अधिष्ठान हैं। ये कविताएँ जीवन तथा तजरूबेसे जुडी है इसलिए मुझे अच्छी लगती है और इसीलिए मुझे पसन्द हैं।"

**'इन्तखाब मैं करूँ, मेरी क्या ताकत हैं उतना ही मिले साईं जितनी मेरी लियाकत है'** (तेरी मर्जी, पृष्ठ क्र. ६२) या सारख्या ओळींतून कवी निबिड आसक्तीच्या जंजाळातून स्वत:चं स्व अबाधित राखत, निवडीचे माहे इन्तखाब टाळत स्वत:च्या पात्रतेचे (लियाकत) अंशूल अबाधित राखतो. ओळींतून व्यक्त होणारी परिणामकारकता इथे शब्दातीत होते आणि अधीकच व्यापक ही कवीची दृष्टी **योथा ज्ञान तेरी बाधा है, होश कम जोश ज्यादा है, सिकुड मत, तू फैल...** (पट्टी खोल, पृष्ठ क्र. ५६) अशा ओळींतून पदोपदी आपली आध्यात्मिक तत्व मिमांसा करीत जाते. सत्व, शिव आणि सदराचेही मांगल्य हा काव्यसंग्रह जपतो.

### सादगी

सादगी की अहमियत जानो
झूठी शक्लवालो पारदर्शी बनो
सहजता में जीना सीखो
सरलता का रस पीना सीखो

गाँठें क्यों बाँध रहे हो?
धागा-धागा पृथक करो
हकीकत को अपना लो
आडम्बर को दफना दो

कृत्रिमता को तिरोहित कर देना है
निर्मल में विराजमान हो जाना है
अकपटता को आलिंगन देंगे
अन्दर-बाहर यकसाँ होंगे

खूबसूरती सादे में है
आसानी सीधे में है
दस्ते में कच्चे कागज क्यों जोड रहे हो?
धाराप्रवाह को उल्टा क्यों मोड रहे हो?

जटिलता की विपक्ष सादगी है
स्वाभाविकता का प्रतिलोम सादगी है
सच्चाई का पार्थिव रूप सादगी है
भेद खोलना सादगी है

सच बोलना सादगी है
सादगी परात्पर गहना है
यूँ वंचना में नही रहना है
पहेली में उलझो नहीं
सादे को साधारण समझो नहीं
भीड के पीछे मत भागो
जागो...! आदमी जागो...!!

अशा संपन्न प्रतिभेच्या सहवासाचा अक्षरखेळाचा 'आइना-मुआइना' हिंदीच नव्हे तर प्रत्येक जतिवंत रसिकाला भुरळ घालणार हे नि:संशय.

## सिडको कर्मचारी सहकारी पतसंस्था, नवीन औरंगाबादच्या अध्यक्षपदी श्री. जनार्धन पाटील व उपाध्यक्षपदी श्री.सुरेंद्रकुमार जैस्वाल यांची निवड

सिडको कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित, सिडको नवीन औरंगाबादच्या संचालक मंडळाच्या बैठकीत **श्री.जनार्धन नबाजी पाटील** यांची अध्यक्षपदी तर **श्री.सुरेंद्रकुमार**



**जैस्वाल** यांची उपाध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आली. यावेळी पतसंस्थेचे सचिव **श्री.संजय औताडे**, उपसचिव **श्री. सुनिल जाधव**, संचालक सर्व **श्री विष्णु चितळे, प्रभाकर भांबळे, खुशाल बागुल, विठ्ठल बनकर, सौ.वैशाली कमळसकर** उपस्थित होते. या निवडीबद्दल सिडको अधिकारी व कर्मचाऱ्यांनी त्यांचे हार्दिक अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## सिडकोचे अधिकारी, कर्मचारी अभिनंदनास पात्र

सिडकोने मागील तीन वर्षांच्या कार्यांचा उत्कृष्ट आलेख असणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना अतिरिक्त पगारवाढ देण्याची नवीन योजना अंमलात आणली असून, या योजने अंतर्गत यावर्षी एकूण ५५ अधिकारी व कर्मचाऱ्यांना अतिरिक्त पगारवाढ देण्यात आली आहे. यात खालील अधिकारी व कर्मचाऱ्यांचाही समावेश आहे.

**श्री.एस.एस.नाईक**(विकास अधिकारी), **सौ. अे. व्ही. वेदूला** (सहयोगी नियोजनकार), **श्री. आर. एम. मानकर** (सहयोगी नियोजनकार), **श्रीमती इलवीन** डिसिल्वा (उच्चश्रेणी लघुलेखक) व **श्री. व्ही. जी. वेदूला** (सहाय्यक अभियंता).

सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे हार्दिक अभिनंदन.



## पदोन्नती

सिडको महामंडळात एप्रिल २००९ मध्ये पुढील कर्मचारी व अधिकाऱ्यांची पदोन्नती देण्यात आली आहे.

**पदोन्नती**

कार्यकारी अभियंता: **श्री. के. टी. मगरे** व **श्री. एम. के. महाले** यांना **कार्यकारी अभियंता** म्हणून पदोन्नती देण्यात आली.

**नियुक्ती**

कार्यकारी अभियंता: **श्री. एस. एस. विसाळे** व **श्री. के. डब्ल्यू बारापात्रे** यांची **कार्यकारी अभियंता** म्हणून नियुक्ती करण्यात आली.

सहाय्यक अभियंता: **श्री. एम. आर. कोंडेकर** यांची **सहाय्यक अभियंता** म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

प्रकल्प समन्वयक (प्रशिक्षण): **श्री. डॉ. पी. एम. माने** यांना **प्रकल्प समन्वयक (प्रशिक्षण)** या पदावर नियुक्त करण्यात आले आहे.

पदोन्नती प्राप्त व सर्व नवनियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांचे सिडको परिवारातर्फे हार्दिक अभिनंदन !

## निरोप समारंभ

**श्री. यशवंत बाळू पाटील** (लेखा अधिकारी) व **श्री. जगदीश धोंडू परदेशी** (कार्यालयीन सहाय्यक) हे आपल्या प्रदीर्घ सेवेनंतर **३० एप्रिल, २००९ रोजी** निवृत्त झाले. प्रशासनातर्फे त्यांना भावपूर्ण निरोप देण्यात आला.

या प्रसंगी भविष्य निर्वाह निधी, इतर सामाईक रकमांचे धनादेश, भेटवस्तू, शाल व



**श्री. जगदीश धोंडू परदेशी**

श्रीफळ देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. या निरोप समारंभा प्रसंगी सिडको कर्मचारी संघटना, बी. सी. एम्प्लॉईज असोसिएशन, इंजिनियर्स असोसिएशन, ऑफिसर्स असोसिएशन, सिडको प्रकल्पग्रस्त कर्मचारी वेल्फेअर असोसिएशन यांनी त्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

संपादक, मुद्रक व प्रकाशक: डॉ. मोहन निनावे, जनसंपर्क अधिकारी, सिडको यांनी सिडको लिमिटेड करीता ही गृहपत्रिका इन-हाऊस स्टुडिओ, सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४, महाराष्ट्र-मार्फत छापून सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४, महाराष्ट्र-येथे प्रकाशित केली. (खाजगी वितरणासाठी).
या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी सिडको व्यवस्थापन सहमत असेलच असे नाही.